इयत्ता १ली ते १२वी पर्यंत शिकणा-या मुला/मुलींना अपघातामुळे क्षतीची नुकसान भरपाई ईत्यादी देण्याबाबत "राजीव गांधी विदयार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना " सन २०१२-१३ पासून नियमित स्वरुपात राबविण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः पीआरई-२०११/प्र.क्र.२४९/प्राशि-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : ०१ ऑक्टोबर, २०१३

वाचा-

**१) शासन निर्णय क्रमांक पीआरई/२००१/५७७८३/(२८९१)/ प्राशि-१, दि. २० ऑगस्ट, २००३**

**२) शासन निर्णय क्रमांक पीआरई/२०११/प्र.क्र.२४९/प्राशि-१, दि. ११ जुलै, २०११**

**प्रस्तावना —**

विदयार्थ्यांना अपघातामुळे पोहोचलेल्या क्षतीची काही प्रमाणात नुकसान भरपाई व सुरक्षा कवच देण्याच्या दृष्टीने राज्यातील इयत्ता १ ली ते उच्च शिक्षण घेणाऱ्या सर्व विदयार्थ्यांसाठी **"राजीव गांधी विदयार्थी सुरक्षा योजना"** विमा कंपन्यामार्फत संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक २० ऑगस्ट, २००३ पासून राबविण्यात येत होती. यासाठी सर्व विदयार्थ्यांचे विम्याचे हप्ते एकत्रितरित्या शासनाकडून अदा करण्यात येत होते.

२. या योजनेचा उद्देश जरी चांगला असला तरी योजनेचा लाभ विदयार्थ्यांना पुरेशा प्रमाणात मिळू शकला नाही. सदरहू विमा कंपन्यांच्या वर्तनाबद्दल शासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. विमा कंपन्या विविध कारणे सांगून विदयार्थ्यांना भरपाई देण्याबद्दल टाळाटाळ करीत होत्या किंवा उशिर लावत होत्या. विदयार्थ्यांच्या अपघाताचे दावे लवकर निकाली लागत नसल्याबाबत विधानमंडळात तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली. या चर्चेच्या अनुषंगाने विमा कंपन्यामार्फत योजना बंद करुन त्या ऐवजी **"सानुग्रह अनुदान योजना"** प्रायोगिक तत्वावर राबविण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधिन शासन निर्णय दि. ११ जुलै, २०११ अन्वये घेतला. सदर योजना दि. २७/०८/२०१० ते दि. २६/०८/२०१२ पर्यंत राबविण्यात आली व खालील दर्शविल्याप्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आली:-

| वर्ष | लाभार्थी विदयार्थ्यांची संख्या | सानुग्रह अनुदानाची रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| सन २०११-१२ | ४०३ | २,७२,६०,००० |
| सन २०१२-१३ | ३२९ | २,३८,४३,००० |
| सन २०१३-१४ | - | ५,००,००,००० |

अदयापही ९४६ पात्र विदयार्थ्यांचे प्रस्ताव शिल्लक असून त्यांना भरपाईची रक्कम अदा करावयाची आहे.

**३.** प्रायोगिक तत्वावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीमार्फत राबविण्यात आलेल्या वरील योजनेची प्रभावीरित्या अंमलबजावणी झाली असून मोठयाप्रमाणावर विदयार्थ्यांना व त्यांच्या पालकांना दिलासा मिळालेला आहे. या योजनेची फलश्रृती लक्षात घेता ही योजना दि. २७ ऑगस्ट, २०१२ पासून नियमित स्वरुपात सुरु ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

**शासन निर्णय-**

**१.** शासन निर्णय क्रमांक पीआरई/२०११/प्र.क्र.२४९/प्राशि-१, दि. ११ जुलै, २०११ अन्वये दि. २७ ऑगस्ट, २०१० ते २६ ऑगस्ट, २०१२ पर्यंत राबविण्यात आलेल्या "**राजीव गांधी विदयार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना**" खालील सुधारणांसह नियमित स्वरुपात राबविण्यात यावी.

**२.** सदरची योजना इयत्ता १ली ते १२ वी पर्यंत शिकणा-या सर्व मुला/ मुलींना लागू राहील.

**३.** सदर योजनेमध्ये विदयार्थ्यांचा अपघात झाल्यास अनुज्ञेय सानुग्रह अनुदान व त्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे खालीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | अपघाताची बाब | सानुग्रह अनुदानाची रक्कम रुपये | प्रस्तावासोबत ३ प्रतीत सादर करावयाची कागदपत्रे |
|---|---|---|---|
| i) | विदयार्थ्यांचा अपघाती मृत्यू | रु. ७५,०००/- | i) प्रथम खबरी अहवाल (FIR)<br>ii) स्थळ पंचनामा<br>iii) इन्क्वेस्ट पंचनामा |

| अ.क्र. | अपघाताची बाब | सानुग्रह अनुदानाची रक्कम रुपये | प्रस्तावासोबत ३ प्रतीत सादर करावयाची कागदपत्रे |
|---|---|---|---|
| | | | iv) सिव्हील सर्जन यांनी प्रति स्वाक्षरीत केलेले मयत विदयार्थ्याच्या बाबतीत शवविच्छेदन अहवाल<br>v) मृत्यू दाखला (सिव्हील सर्जन यांनी प्रति स्वाक्षरीत केलेले) |
| ii) | अपघातामुळे कायमचे अपंगत्व (२ अवयव / दोन डोळे किंवा १ अवयव व १ डोळा निकामी) | रु. ५०,०००/- | अपंगत्वाच्या कारणाबाबतचे डॉक्टरांचे अंतिम प्रमाणपत्र सिव्हील सर्जन यांच्या प्रति स्वाक्षरीसह (कायम अपंगत्वाचे प्रमाणपत्र) |
| iii) | अपघातामुळे कायमचे अपंगत्व (१ अवयव किंवा १ डोळा कायम निकामी) | रु. ३०,०००/- | अपंगत्वाच्या कारणाबाबतचे डॉक्टरांचे अंतिम प्रमाणपत्र सिव्हील सर्जन यांच्या प्रति स्वाक्षरीसह (कायम अपंगत्वाचे प्रमाणपत्र) |

४. विदयार्थ्यांच्या सानुग्रह अनुदानाचे प्रस्ताव तयार करण्याची जबाबदारी विदयार्थ्यांचे पालक व संबंधित शाळांचे मुख्याध्यापक / गट शिक्षणाधिकारी/ शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) / शिक्षण निरिक्षक यांची राहील

५. या योजनेमध्ये खालील बाबींचा सामवेश राहणार नाही.

i) आत्महत्येचा प्रयत्न करणे,

ii) आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वत:ला जखमी करुन घेणे

iii) गुन्हयाच्या उद्देशाने कायदयाचे उल्लंघन करताना झालेला अपघात,

iv) अंमली पदार्थ्यांच्या अंमलाखाली असताना झालेला अपघात,

v) नैसर्गिक मृत्यू

vi) मोटार शर्यतीतील अपघात

६. या योजनेतंर्गत विदयार्थ्यांचे निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदानाची रक्कम पुढील प्राधान्य क्रमानुसार अदा करावीत.

i) विदयार्थ्याची आई

ii) विदयार्थ्याची आई हयात नसल्यास वडील

iii) विदयार्थ्याची आई -वडील हयात नसल्यास १८ वर्षावरील भाऊ किंवा अविवाहीत बहीण किंवा पालक

**७. या योजनेतील प्रस्ताव निकाली काढण्यासाठी खालीलप्रमाणे प्रत्येक जिल्हयात समिती गठित करण्यात येत आहे.** :-

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | जिल्हाधिकारी | : | अध्यक्ष |
| (ii) | मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) | : | सदस्य |
| (iii) | पोलीस अधिक्षक/पोलीस उपायुक्त (प्रशासन) | : | सदस्य |
| (iv) | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | : | सदस्य |
| (v) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक/शिक्षण निरिक्षक) | : | सदस्य सचिव |

८. वरिल समितीसमोर इयत्ता १ली ते ८वी व९ वी ते १२ वी मध्ये शिकणा-या मुला/मुलींकरिता प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी अनुक्रमे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील. बृहन्मुंबई शहराकरीता संबंधित शिक्षण निरिक्षक यांनी प्रस्तावांची छाननी करुन समितीसमोर सादर करावेत.

९. <u>योजनेची कार्यपध्दती व संबंधितांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या-</u>

i) पात्र विदयार्थ्यांच्या पालकांने सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव ३ प्रतीत ( **विवरणपत्र - अ** ) संबंधित मुख्याध्यापकांमार्फत इयत्ता १ ली ते ८ वी व ९वी ते १२ वी पर्यंतच्या मुला/मुलींकरिता अनुक्रमे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी( माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करावे. मात्र, बृहन्मुंबई शहराकरिता सदर प्रस्ताव संबंधित विभागाचे शिक्षण निरिक्षक (पश्चिम/उत्तर/दक्षिण) यांच्याकडे संबंधीत पालकाने दाखल करावे. सदर अर्जांची छाननी शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)/ शिक्षण

निरिक्षक यांनी करावी आणि जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीपुढे बैठकीच्यावेळी सादर करावी.

ii) सदर समितीची बैठक आवश्यकतेप्रमाणे महिन्यातून एकदा घेण्यात यावी.

iii) या योजने अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने सर्व बाबींचा विचार करुन निर्णय घ्यावा. समितीचा निर्णय अंतीम राहील. समितीने प्रस्ताव नाकारल्यास संबंधित पालकांना लेखी स्वरुपात कारणासह कळवावे.

iv) समितीने मंजूर केलेल्या प्रस्तावांची रक्कम संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)/ शिक्षण निरिक्षक यांनी संबंधित संस्थेच्या मुख्याध्यापकांमार्फत एकाच हफ्त्यात धनादेशाव्दारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये ७ दिवसात जमा करावे.

v) या योजनेच्या अंमलबजावणीकरिता शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) /शिक्षण निरिक्षक यांना **आहरण व संवितरण अधिकारी** (DDO) म्हणून घोषित करण्यात येत आहे.

Vi) या योजनेची प्रभावी अंमलबजावणीची सर्व जबाबदारी शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी हया योजनेची योग्य ती प्रसिध्दी करावी, वेळोवेळी सर्व संबंधितांचा आढावा घ्यावा व दरमहिन्याला शासनाला सविस्तर अहवाल सादर करावा

**१०.** या योजनेखाली येणारा खर्च लेखाशिर्ष २२०२- सर्वसाधारण शिक्षण ८०-सर्वसाधारण, ८०० इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०६) (०२) राज्यातील विदयार्थ्यांसाठी अपघात विमा योजना (२२०२ ३१०९) ३1 सहायक अनुदाने, मागणी क्र. ई-२, या लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षाच्या उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

**११.** सदर आदेश नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६३०/निवि-१४७१ दि. २१/०२/२०१३ तसेच वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक १६०/व्यय-५, दि. २९/०३/२०१३ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१००११३०५४३७८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2013.10.01 17:00:43 +05'30'

**(ना.ऊ.रौराळे)**

सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

२. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव

४. मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, (सर्व)

५. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव

६. मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)

७. सर्व विधानसभा /विधानपरिषद सदस्य

८. मा. मुख्यसचिव, यांचे स्वीय सहाय्यक

९. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

१०. सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई

११. सर्व आयुक्त, महानरगपालिका

१२. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

१३. सर्व जिल्हाधिकारी

१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

१५. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे

१६. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.

१७. शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

१८. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

१९. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पुणे.

२०. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, णे

२१. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई

२२. आयुक्त, आदिवासी विकास, आदिवासी विकास भवन, आग्रा रोड, नाशिक

२३. आयुक्त, कृषि संचालनालय, सेंट्रल इमारत, पुणे

२४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, सेंट्रल इमारत, पुणे

२५. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

२६. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

२७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र ½, मुंबई / नागपूर

२९. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागूपर

३०. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक /प्रौढ), जिल्हा परिषद

३१. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद

३२. सर्व प्रशासन अधिकारी, नगरपरिषद / कटक मंडळे

३३. शिक्षण निरिक्षक (दक्षिण /पश्चिम /उत्तर) बृहन्मुंबई

३४. शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सर्व कार्यासने

३५. निवड नस्ती (प्राशि-१)